# महाराष्ट्रातील विद्यापीठांपुढील काही शैक्षणिक व शासकीय समस्या

[ मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने दिलेली व्याख्याने ]


लेखक

वसंत हरी गोळे

*निवृत्त कुलसचिव, पुणे विद्यापीठ*


डॉ. पि. म. दांडेकर यांस सप्रेम भेट

व. ह. गोळे


मुंबई मराठी साहित्य संघ

प्रथमावृत्ती : एप्रिल १९७२

© वसंत हरी गोळे

किंमत २ रुपये

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव पार्वती '
टिळक रस्ता, पुणे ३०

प्रकाशक :
दि. वि. आमोणकर
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. भालेराव मार्ग, मुंबई ४

# प्रस्तावना

मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने मी दिनांक २५, २६ आणि २७ नोव्हेंबर १९७१ रोजी जी व्याख्याने दिली ती आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत. संघाच्या नियमांप्रमाणे व्याख्यानांची टंकलिखित प्रत आधीच संघाच्या हवाली केली होती. प्रत्यक्ष व्याख्यानाच्या वेळी तीत समाविष्ट नसलेली काही तपशीलवार माहिती मी श्रोत्यांना दिली. तिचा अंतर्भाव या पुस्तिकेत केलेला नाही. मूळ टंकलिखित प्रतीतला थोडा केवळ औपचारिक भाग गाळला आहे आणि काही मोजकाच मजकूर मुद्द्यांच्या स्पष्टीकरणासाठी अवश्य वाटला तेथे जास्त घातला आहे.

या प्रसंगी कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची मला विशेषकरून आठवण होते. गत वर्षी मार्च महिन्यात जेव्हा धनंजयराव पुण्यात आले होते तेव्हा मी त्यांना माझ्या नियोजित व्याख्यानांची माहिती दिली आणि कोणत्या मुद्द्यांची चर्चा करावी आणि कोणत्या ग्रंथांचे वाचन करावे याबाबत त्यांचा सल्ला मागितला. ते म्हणाले, " मी आता मे महिन्यामध्ये पुन्हा पुण्यात येणार आहे. तेव्हा मला भेट म्हणजे आपण सविस्तर बोलू. " दुर्दैवाने ते मे महिन्याच्या प्रारंभी दिल्ली सोडून पुण्यास येत असताना वाटेतच त्यांचे आकस्मिक निधन झाले आणि त्यांच्या बहुमोल सल्ल्याचा लाभ मला मिळू शकला नाही. तो मिळाला असता तर प्रस्तुत व्याख्यानांतील उणिवा बऱ्याच अंशी कमी झाल्या असत्या.

शासकीय प्रश्नांची चर्चा करताना राजकीय क्षेत्रातली व्यक्तिनिष्ठ कारभाराची अनिष्ट प्रथा आता विद्यापीठांपर्यंत पोचली आहे, असे मी म्हटले होते. तेव्हा पुणे विद्यापीठातली झपाट्याने बिघडत चाललेली परिस्थिती प्रामुख्याने माझ्या नजरेसमोर होती. ती पुढे लवकरच इतकी खालावली की, कुलगुरूंना विद्यापीठाच्या कारभाराची

चौकशी करण्यासाठी एक समिती नेमणे भाग पडले! राधाकृष्ण आयोगाच्या अहवालातील जो भाग मी पहिल्या व्याख्यानात उद्धृत केला आहे, त्यात पुढील वाक्ये आहेत.

" सत्तास्थानावर असलेल्या बऱ्याच जणांना अभिलाषा, स्वार्थ आणि द्वेष या दुर्गुणांनी ग्रासले आहे. विद्यापीठांनी स्वतःच्या वागणुकीने सौजन्य व न्याय यांचे आदर्श समाजापुढे ठेवले पाहिजेत. परंतु दुर्दैवाने बऱ्याच विद्यापीठांत तशी परिस्थिती नाही. कारखानांना आणि उत्पादकांना कमी वाव मिळेल अशी केवळ यंत्रणा उभारून भागणार नाही. तर काम करणाऱ्या लोकांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे जरूर आहे. "

पुणे विद्यापीठाची सद्यःस्थिती इतकी बोलकी आहे की, तिच्या संदर्भात वरील उताऱ्याचे औचित्य जास्त स्पष्टपणे विशद करण्याची मुळीच जरूरी नाही. आता सत्ताभिलाषा नसलेल्या सज्जनांनी संघटित होऊन विद्यापीठाच्या निरनिराळ्या अधिकारमंडळात आपला आवाज उठविणे क्रमप्राप्त आहे.

माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल, आणि ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल, मुंबई मराठी साहित्यसंघाचा मी अत्यंत ऋणी आहे. संघाचे प्रमुख कार्यवाह श्री. दि. वि. आमोणकर आणि संघाच्या साहित्य समितीचे कार्यवाह श्री. वि. पु. भागवत यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. पहिल्या व्याख्यानात गेल्या शतकाच्या अखेरीस आणि चालू शतकाच्या प्रारंभी जी परिस्थिती होती तिचे विवेचन आहे. ती माहिती कै. श्री. सय्यद नुरुल्ला आणि श्री. जे. पी. नाईक यांच्या A History of Education in India या ग्रंथातून घेतली आहे हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे जरूर आहे पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. कृ. शं. हिंगवे आणि त्यांचे सहकारी यांनी मला हवे असलेले ग्रंथ तत्परतेने उपलब्ध करून दिले. विद्यापीठाच्या कचेरीतील माझे पूर्वीचे निकट सहकारी श्री. रं. श्री. सरदेशपांडे, श्री. ग. ज. अभ्यंकर इत्यादींनी मला निरनिराळ्या समित्यांचे अहवाल वगैरे साहित्य दिले. संदर्भ ग्रंथांची सूचि करण्याचे कामी ग्रंथालयाचे श्री. वि. कृ. मेहेंदळे आणि कार्यालयातील सौ. माधुरी रानडे यांनी मदत केली. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

पुणे विद्यापीठ आवार,
पुणे : ७
दि. १९ एप्रिल १९७२

**वसंत हरी गोळे**

# संदर्भ ग्रंथांची सूची


| | |
|---|---|
| ( 1 ) AIRAN, J. W., BARNBAS, T, and SHAH, A. B. | : Climbing a wall of Glass: Aspects of Educational Reforms in India. Bombay, Manaktalas. 1965. |
| ( 2 ) BANERJEE, Pramathanath And Others, Ed. | : Hundred Years of the University of Calcutta. University of Calcutta, 1957. |
| ( 3 ) DAICHES, David, Ed. | : The Idea of a New University, an Experiment in Sussex. London. Andre Deutsch, 1964 |
| ( 4 ) DONGERKERY, S. R. | : A History of the University of Bombay, 1857–1957. Bombay. University of Bombay. 1957. |
| ( 5 ) DONGERKERY, S. R. | : Memoirs of Two Universities. Bombay. Manaktalas. 1966. |
| ( 6 ) DONGERKERY, S. R, | : Universities and Their Problems Bombay, Hind Kitabs Ltd., 1948. |
| ( 7 ) GADGIL, Dr. D. R. | : Convocation Address. Poona University. 1966. |

(8) Government of India, Ministry of Education. : Indian University Administration. Manager of Pulications 1958.

(9) LETHBRIDGE, Roper. : High Education in India. A Plea for the State Colleges. London. Wm. H. Allen and Co., 1882.

(10) LORD ROBBINS. : Report on Higher Education. London. Her Majesty's Stationery Office. 1965.

(11) NURULLAH, Syed and NAIK, J. P. : A History of Education in India (During the British Period) Bombay. Macmillan and Co. 1951.

(12) Report of the Committee appointed to review " the working of University teaching arrangements. " : Poona University. 1957.

(13) Report of the Committee on " Model Act for Universities. " : Ministry of Education Government of India, New Delhi. 1964.

(14) Report regarding the " Bharatiya Bhasha Vikas Parishad. " : Poona University. 1964.

(15) Report of the Committee on " Governance of Universities and Colleges. " Part I. : University Grants Commission. 1971.

(16) Report of the Seminar on Examinations held in January 1971. : Inter University Board of India and Ceylon. 1971.

(17) Report of the University Education Commission Vol. I and II. : Government of India, Ministry of Education, 1949

(18) Report of the Education Commission 1964-66 : Government of India, Ministry of Education, 1966.

(19) SHAH, A. B. Ed. : Higher Education in India. Bombay. Lalwani Publishing House. 1967.

(20) White Paper ( Draft ) ( Outlining the Educational Reconstruction proposed to be undertaken. ). : Government of Maharashtra, Bombay. 1968.